# ब.स.शि.प्र.मंडळाचे
# कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
# सोनगीर ता.जि.धुळे

## राष्ट्रीय सेवा योजना
## वार्षिक अहवाल
## २०१८-१९

**प्राचार्य**

**कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

**सोनगीर ता.जि.धुळे**

# ब.स.शि.प्र.मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनगीर
## वार्षिक अहवाल सन २०१८-१९

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ सुरवात आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककासाठी विशेष आनंद देणारी ठरली. दि.२१/०६/२०१८ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला या प्रसंगी योग प्रशिक्षक म्हणून आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापक नरेन्द्र पाटील [शारीरिक शिक्षण संचालक] यांनी प्रत्यक्ष कृतीतून आरोग्य कसे सुदृढ राहील हे पटवून दिले. योगामुळे मन शांती लाभते त्यात त्यांनी विविध आसने व त्याचे फायदे यावर मार्गदर्शन केले यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.भाऊसाहेब श्री.अमृतरावजी केशवरावजी कासार व महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर बंधू भगिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.डी.पाटील यांनी केले वं आभार प्रदर्शन प्रा.गुलाब पाटील यांनी केले



दि.०९/०७/२०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक संपन्न बैठकीस महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील यांच्या .अध्यक्षतेखाली सल्लागार समितीची मिटिंग बोलविण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने वर्षभर राबविले जाणारे उपक्रम या विषयी चर्चा करण्यात येवून त्या संदर्भातील नियोजन करण्यात आले.

रासेयो मधून विद्यार्थाचा व्यक्तिमत्व विकास होण्यसाठी विविध उपक्रमाची आखणी करण्यात आली. महाविद्यालय स्तरीय विविध स्पर्धाचे आयोजन करणे. वर्षभर विविध राष्ट्रीय दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करणे. महाविद्यालयिन परिसर व दत्तक गावाची साफसफाई करणे.


दि.१२/०७/२०१८ रोजी रासेयो वतीने वृक्षारोपणच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.भाऊसाहेब श्री.अमृतरावजी केशवरावजी कासार,महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील, प्राध्यापक व इतर कर्मचारी यांनी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये विविध प्रकारच्या वृक्षाची लागवड केली त्यात वड,पिपळ,लिंब,निलगिरी या वृक्षाची लागवड केली. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर बंधू भगिनी उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रा.व्ही.डी.पाटील व सहा.अधिकारी प्रा.गुलाब .पाटील यांनी परिश्रम घेतले.



दि.१/०८/२०१८ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.भाऊसाहेबश्री.अमृतरावजी केशवरावजी कासार हे होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रतिमा पूजन करून प्रमुख अतिथीनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला तसेच अध्यक्षीय भाषणातून मा.प्राचार्य यांनी लोकमान्य टिळकाचे प्रखर विचार व त्या विचाराची समाजातील गरज विद्यार्थांना आपल्या भाषणातून पटवून दिले. प्रा.एस.एस.धनगर यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.डी.पाटील यांनी केले सूत्रसंचालन प्रा.गुलाव.पाटील व आभार प्रदर्शन प्रा.एस.एस.धनगर यांनी केले.


दि.०५/०८/२०१८ रोजी रासेयो विद्यार्थींनी श्रमदान केले. ज्या ठिकाणी वृक्षारोपण केलेले होते तेथील गवत काढून वृक्ष सवर्धनसाठी काम केले. श्रमदान केल्यानंतर सर्वांची हजेरी घेण्यात आली . त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना नाश्ता चहा देण्यात आला.





दि.१५/०८/२०१८ रोजी रासेयो विद्यार्थींनी पांढरा गणवेश व गांधी टोपी परिधान करून स्वातंत्र्य दिवस साजरा केला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.भाऊसाहेब श्री.अमृतरावजी केशवरावजी कासार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील, शास. आश्रम शाळेचे कर्मचारी तसेच गावातील ग्रा.प. पदाधिकारी सर्व सन्मानिय संचालक मंडळ उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.डी.पाटील यांनी केले सहा.प्रागुलाब .पाटील, क्रीडा संचालक प्रा.एन.व्ही.पाटील म.का.अधिकारी प्रा.पी.डी.पाटोळे महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर बंधू भगिनी उपस्थित होते. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्रगणात वृक्षारोपणच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.





श्रमदान केले. महाविद्यालयाचा परिसर व महाविद्यालाया शेजारील वस्ती येथे स्वछता करण्यात आली या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.भाऊसाहेब श्री.अमृतरावजी केशवरावजी कासार महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील हे स्वत: श्रमादानासाठी उपस्थित होते. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.पी.आर.देवरे.प्रा.अनिल पाटील.प्रा.सुभाष धनगर,डॉ.राजेंद्र जाधव हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. व्ही.डी.पाटील यानी केले. श्रमदान केल्यानंतर सर्वांची हजेरी घेण्यात आली . त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना नाश्ता चहा देण्यात आला.



दि.२४/०९/२०१८ रोजी रासेयो विभागामार्फत "राष्ट्रीय सेवा योजना" दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील,यांनी केले. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा मा.डॉ.आर.जी.खैरनार प्रमुखपाहुणे म्हणून डॉ.आर.के.जाधव माजी जिल्हा समन्वयक रासेयो धुळे विभाग हे होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला रासेयोच्या विद्यार्थिनी स्वागत गीताने प्रमुख पाहुण्याचे स्वागत केले. तसेच व्यासपीठावर प्रा.डॉ.पी.आर.देवरे,प्रा.गुलाब पाटील, प्राध्यापिका के.यू. सोनवणे उपस्थित होते. डॉ.आर.के.जाधव यानी आपल्या मनोगतातून राष्ट्रीय सेवा योजनामुळे होणारे परिवर्तन, स्वावलंबन,शिस्त शिकविणारी सेवा योजना आणि त्यातून नागरिक म्हणुन समाजात कसा उभा राहतो हे आपल्या मनोगतातून पटवून दिले.कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रा.व्ही.डी.पाटील यांनी केले सूत्रसंचालन प्रा.गुलाब .पाटील व आभार प्रदर्शन प्रा.डॉ पी.आर.देवरे यांनी केले.




दि.३०/०९/२०१८ रोजी श्रमदान आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील कला व् विज्ञानं विभागातील सर्व विद्यार्थ्यांना श्रमदानासाठी महाविद्यालय परिसर स्वछता साठी बोलावीण्यात आले होते. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्मचारी वृन्द हजर होते.

दि.०२/१०/२०१८ रोजी'स्वच्छ भारत अभियान'संपन्न म.गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्ताने "स्वच्छ भारत अभियानाची प्रत्यक्ष स्वच्छता करून सुरुवात झाली. सुरुवातीला म.गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.भाऊसाहेब श्री.अमृतरावजी केशवरावजी कासार, महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन कारण्यात आले. महाविद्यालयाचा परिसर, बस स्थानक यांची स्वच्छता करण्यात आली.रासेयोच्या विद्यार्थि, प्राध्यापक व कर्मचारी बंधू भगिनी मिळून साफसफाई करण्यात आली.



दि.१४/१०/२०१८ रोजी रासेयोचे एकदिवसीय शिबीर मौजे कलमाडी ता. शिंदखेडा जि. धुळे येथे झाले. मा.सौ.मालूताईशिवाजीपाटील(सरपंच,ग्रा.प.कलमाडी) यांच्या हस्ते उद्घाटन झाले. ग्रामीण जनतेला स्वच्छतेचे महत्व पटवून देणे हा शिबिराचा मुख्य उद्देश होता. शिबिरार्थींनी ग्राम स्वच्छतेला प्राधान्य दिले. ग्राम स्वच्छता अभियान उस्फूर्त सहभाग घेतला. प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील यांनी निरामय जीवनासाठी परिपूर्ण स्वच्छता आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमास संस्थेचे संचालक मा.संदीपभैया कासार यांनी दत्तक गावाची संकल्पना स्पष्ट केली.ग्रा.प.कलमाडी सदस्य युवराज कदम व सर्व ग्रा.प.कलमाडी सदस्य, मा.श्री.एस.ए.कदम(मुख्याध्यापक), तंटा मुक्ती अध्यक्ष मा. देविदास दगा पाटील कलमाडी गावातील आजी माझी पदाधिकारी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रम अधिकारी प्रा. व्ही.डी.पाटील यांनी केले प्रा.गुलाब पाटील यांनी संयोजन यांनी केले.





दि.१५/१०/२०१५ रोजीरासेयो मार्फत डॉ.ए.पी.जे. कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील, माजी. जिल्हा समन्वयक डॉ.आर.के.जाधव, माजी कार्यक्रम अधिकारी डॉ.आर.जी.खैरनार प्रा.डॉ.पी.आर.देवरे.विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.एस.आर.राणे. यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन कारण्यात आले. माजी. जिल्हा समन्वयक डॉ.आर.के.जाधव, यानी डॉ.कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.त्याच प्रमाणे प्रा. अभय देवरे.ग्रंथपाल यानी वाचनाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील अध्यक्षीय मनोगतातून जीवन पटावर प्रकाश टाकला. वाचन संकृती जोपासावी असे सागीतले.





दि.२६/११/२०१८ रोजी रासेयो मार्फत सविधान वाचन दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.डी.पाटील यांनी सविधान पत्रिकेचे वाचन केले. महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.





दि.०१/१२/२०१८ रोजी रासेयो मार्फत आंतरराष्ट्रीय एडस् दिनानिमिनाताने सोनगीर ग्रामीण रुग्णालय मधील डॉ. किरणकुमार निकवाडे यांचे एडस् व्याखान आयोजित करण्यात आले.या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील होते. या प्रसंगी सोनगीर ग्रामीण रुग्णालयचे श्रीमती शीतल पाटील, श्री.कैलास वाडीले, अश्विनी जाधव विविध व्यक्त्यानी एडस् विषयी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.डी.पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन सहा.प्रा.गुलाब पाटील यानी केले., आभारप्रदर्शन म.का.अधिकारी प्रा.पी.डी.पाटोळे यांनी केले.



दि.०६/१२/२०१८ रोजी रासेयो मार्फत डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमिनाताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमास महाविद्यालयचे संस्थापक अध्यक्ष मा.भाऊसाहेब अमृतवजी कासार हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के बी पाटील उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी सुरवातीस मान्यवरांनी डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन केले . त्यानंतर मा.भाऊसाहेब अमृतवजी कासार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य याविषयी विचार व्यक्त केले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के बी पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांनी "शिका संगठीत व्हा" . हा मूलमंत्र लक्षात घेऊन कार्य करत राहणे याविषयी मूलमंत्र मा. महोदयांनी दिला तसेच महाविद्यालायातील प्राध्यापक अनिल पाटील व एस.एस. धनगर यांनी हि आपले विचार व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.व्ही.डी.पाटील यांनी केले . तर आभार प्रदर्शन प्रा.गुलाब .पाटील यांनी केले.



**दि.२३ डिसेंबर २०१८** रोजी ठीक ११.०० वाजता शिबीराचे उद्घाटक कुमार श्रीपाद निबाजी पाटील यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.भाऊसाहेबश्री.अमृतरावजीकेशवरावजी कासार तसेच मा.सौ.मालूताई शिवाजीपाटील(सरपंच,ग्रा.प.कलमाडी)हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील हे होते. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष बापूसाहेब दंगल वामन धनगर संचालक मा.श्री.मुरलीधर मंगा चौधरी,मा.संदीपभैया कासार,मा. युवराज भाऊ तथा पंकज जी कदम (उप सभापती कृ.उ.बा.समिती, दोंडाईचा) व सर्व ग्रा.प. सदस्य कलमाडी, मा.श्री.एस.ए.कदम(मुख्याध्यापक), तंटा मुक्ती अध्यक्ष मा. देविदास दगा पाटील कलमाडी गावातील आजी माझी पदाधिकारी उपस्थित होते तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.डी.पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. गुलाबराव पाटील सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व आभार प्रदर्शन प्रा.एस.आर.राणे.
दुपारच्या सत्रात प्रा.डॉ.एस.बी.खैरनार यानी व्यसन मुक्ती या विषयावर मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. गुलाबराव पाटील हे होते. तिसऱ्या सत्रात विद्यार्थीचे गट तयार करून दैनंदिन कामकाजाची विभागणी करण्यात आली.

**दि.२४ डिसेंबर २०१८** रोजी पहाटे प्रभात फेरी, योगासने व प्रार्थना घेण्यात आली. रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.डी.पाटील यांनी विद्यार्थांकडून योग करून घेतले. प्रा.व्ही.डी.पाटील व माजी विद्यार्थी लखन झालसे व विक्की जाधव नागेश पवार यांनी विद्यार्थासमोर देश भक्तिवर आधारित गीते सादर केली यानंतर विद्यार्थांनी चहा नास्ता घेतला.यानंतर श्रमसंस्कार म्हणून कलमाडी गावातील नागरिकांनी सुचविल्याप्रमाणे विद्यार्थांनी कलमाडी गावात जाऊन रामनगर परिसरात गटारीत साचलेले प्लास्टिक कागद व् कचरा साफ सफाई केली.विद्यार्थांनी गावातील असलेला केर कचरा एका ठिकाणी जमा केला त्यामध्ये ग्रा.प. चे पदाधिकारांचा व गावातील नागरिकांचा ग्राम स्वच्छतेम्ध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. गावात स्वच्छतेचे कामा सुरु असतांना गावातील नागरिकानी योग्य त्या सूचना दिल्यात.

दुपारी स्नेह भोजन सुरु असताना मा.अध्यक महोदय श्री कासार साहेब यानी शिबिरास सदिच्छा भेट दिली जेवणा बाबत चौकशी केली. त्यानंतर म्हसदी येथील मा.प्रा.शिवाजीराव पाटील यांनी पर्यावरण संवर्धन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.अनिल पाटील होते. यांनी कॅशलेस प्रणाली या विषयावर मनोगत व्यक्त केले.
तिसऱ्या सत्रात विद्यार्थीनी विविध प्रकारचे बौद्धिक खेळाचे आयोजन केले. रात्री नेताजी गटाने गटाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केलेत. याप्रसंगी गावातील ग्रा.प. चे पदाधिकारी उपस्थित होते. त्यानंतर विद्यार्थीनी नोदवहीत दैनंदिन नोंदी केल्या.

**दि.२५ डिसेंबर २०१८** रोजी पहाटे प्रभात फेरी, योगासने व प्रार्थना घेण्यात आली. रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.डी.पाटील यांनी विद्यार्थांकडून योग करून घेतले. प्रा.गुलाबराव .पाटील व माजी विद्यार्थी, लखन झालसे व विक्की जाधव,नागेश पवार यांनी विद्यार्थासमोर राष्ट्रीय सेवा योजना ची गीते सादर केली यानंतर विद्यार्थांनी चहा नास्ता घेतला. श्रमसंस्कार म्हणून कलमाडी गावातील

नागरिकांनी सुचविल्याप्रमाणे विद्यार्थीनी कलमाडी गावात जाऊन शिवाजी चौक, ग्रा.प.चौक, ज्ञानमंदिर चौक,पंचशील चौक, परिसरात विद्यार्थीनी गावातील असलेला केर कचरा एका ठिकाणी जमा केला त्यामध्ये ग्रा.प. चे पदाधिकारांचा व गावातील नागरिकांचा ग्राम स्वच्छतेमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग होता.

दुपारी स्नेह भोजनानंतर गीतमंच व त्यानंतर मा.प्रा.विलासराव चव्हाण पालेशा महा. धुळे यांनी स्त्री शिक्षण आणि समाज या विषयावर व्याख्यान दिले. त्यानी आपल्या व्याख्यानात **ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा काय भुललासी वर्लिया** रंगा या अभंगा प्रमाणे वरचा रंग महत्वाचा नाही तर अंतरंग पाहावा असे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.आर.के.जाधव हे होते. त्यानी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बेटी बचाव बेटी पढाव या विषयावर मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात विद्यार्थीनी विविध प्रकारचे बौद्धिक खेळाचे आयोजन केले. रात्री राजे छत्रपती गटाने गटाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केलेत. याप्रसंगी उपसभापती कृ.उ.बा.समिती दोंडाईचा युवराज जी कदम व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. त्यानंतर विद्यार्थीनी नोदवहीत दैनंदिन नोंदी केल्या.

**दि.२६ डिसेंबर २०१८** रोजी पहाटे प्रभात फेरी, योगासने व प्रार्थना घेण्यात आली. नित्य नियमाने सकाळचे सर्व कार्यकम आटोपल्यानंतर श्रमदानासाठी अमरधाम येथील जागेमध्ये वृक्ष लागवडी खड्डे खोदले त्याच प्रमाणे तेथेच साठवण बंधार्यावर काम केले. दुपारच्या सत्रात मा. प्रा. सतिशजी अहिरे यानी ग्रामीण विकास आणि युवक या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.डी.आर.पाटील होते. याच दिवशी मा. प्राचार्य डॉ.के.बी.पाटील सर यानी शिबिरास भेट दिली आणि विद्यार्थ्यांची विचारपूस केली. त्याच प्रमाणे प्रा. एस,आर.राणे व प्रा. आर.पी नागराले यानी ही भेट दिली. श्री राणे सर यानी युवारंग बाबत मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात विविध या विषयावर गटचर्चा केली. रात्री लोकमान्य टिळक गटाने गटाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केलेत. त्यानंतर विद्यार्थीनी नोदवहीत दैनंदिन नोंदी केल्या.

**दि.२७ डिसेंबर २०१८** रोजी पहाटे प्रभात फेरी, योगासने व प्रार्थना घेण्यात आली. नित्य नियमाने सकाळचे सर्व कार्यकम आटोपल्यानंतर श्रमदानासाठी साठवण बंधार्यावर काम केले. दुपारच्या सत्रात मा.श्री. एम्.एन.पाटकर यांनी ग्रामीण महिलांच्या रक्तातील ह्युमोग्लोबिन या विषयावर मार्गदर्शन केले.त्याच प्रमाणे डेंगू आजारा बाबत जनजागृती करण्याचे आव्हान केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.आर.के.जाधव हे होते. दुपारी चार ते पाच या वेळात प्रा.डॉ आर जी खैरनार यानी ग्रामीण विकासात शासकीय योजनाचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष बापूसाहेब दंगल वामन धनगर हे होते.याच वेळी मा. प्रा.डॉ.आर.के.जाधव माजी जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना धुले विभाग यानी भेट दिली.

तिसऱ्या सत्रात माजी विद्यार्थी, लखन झालसे व विक्की जाधव नागेश पवार यांनी विद्यार्थांना गटा गटानेमार्गदर्शन केले. रात्री संत गाडगेबाबा गटाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केलेत. ग्रामस्थ उपस्थित होते. त्यानंतर विद्यार्थीनी नोदवहीत दैनंदिन नोंदी केल्या.

**दि.२८ डिसेंबर २०१८** रोजी पहाटे प्रभात फेरी, योगासने व प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर विद्यार्थीनी चहा नस्ता घेतला. जि.प. शाळेचा परिसर व नवीन गाव वसाहतीत ग्राम स्वच्छता केली. जमा केलेला कचरा संकलित करून एका ठिकाणी करण्यात आला. त्याच प्रमाणे डॉ पाटकर यानी केलेल्या आव्हानात्मक निवेदनाच्या पूर्ति साठी गावातून घोषणा देत डेंगू बाबत जनजागृती केली. दुपारी दुपारी स्नेह भोजनानंतर विभागीय समन्वयक मा.प्रा.प्रवीण महाले यांनी शिबीर स्थळी भेट दिली व विद्यार्थांना पाणी व्यवस्थापन कालाची गरज या मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.पी आर.देवरे हे होते. त्यानी ग्रामीण साहित्य व् स्त्री शिक्षण या विषयावर मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात विद्यार्थीनी विविध प्रकारचे बौद्धिक खेळाचे आयोजन केले. रात्री सर्व गट मिळून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केलेत. याप्रसंगी गावातील सरपंच व उपसरपंच व विविध संस्थाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**दि.२९ डिसेंबर २०१८** रोजी म्हणजे समारोपाचा दिवस याप्रसंगी विद्यार्थानी सकाळपासून कार्यक्रमाची तयारी केली त्यानंतर मान्यवराचे आगमन झाले. समारोप समारंभाचे अध्यक्ष मा.भाऊसाहेब अमृतरावजी केशवराव जी कासार संस्थापक अध्यक्ष ब.स.शि.प्र. मंडल सोनगीर समारोपकर्ते मा.प्रा.डॉ.वाल्मिकजी आढावे मा.संचालक मुरलीधरजी चौधरी, उपाध्यक्ष मा. बापुसो दंगल वामन धनगर,[सर्व संचालक मंडल] पंकज भाऊ कदम, मा.सौ.मालूताई शिवाजीराव पाटील (सरपंच, ग्रा. प. कलमाडी) प्रा.डॉ.आर.के.जाधव,संस्थेचे संचालक मा.संदीपभैया कासार, व सर्व ग्रा.प.कलमाडी सदस्य, मा.श्री.एस.ए.कदम (मुख्याध्यापक), तंटा मुक्ती अध्यक्ष मा. देविदास दगा पाटील कलमाडी गावातील आजी माजी पदाधिकारी,महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी बंधू भगिनी, शिबिरार्थी बंधू भगिनी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

दि.०३/०१/२०१९ ब.स.शि.प्र.मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयत सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.बी.पाटील यांच्या शुभहस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापुजन करण्यात आले. मा.प्राचार्य डॉ. के.बी.पाटील यानी आपल्या मनोगतातुन प्राचीन काळात स्त्रियांवर कशी बंधने होती.त्यातूनच स्त्रिया जीवनात चुल आणि मूल या बंधनातुन बाहेर पडल्या नाहीत. मग सावित्रीबाई यानी 19 व्या शतकात मोठे कष्ट घेतले म्हणून आजची स्त्री ही समाजात मानाने उभी आहे असे मौलिक विचार व्यक्त केले. या प्रसंगी प्रा.डॉ.आर. जी.खैरनार व प्रा. अनिल पाटील यानीही मनोगत व्यक्त केले. सादर कार्यक्रम प्रसंगी **रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.डी.पाटील** प्रा.गुलाब पाटील प्रा.ए.बी.पाटील **विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.एस.आर.राणे.** प्रा.डॉ.पी.आर.देवरे.प्रा.आर.पी.नगराळे प्रा.डॉ.के.एन.सालुंखे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.एस.एस.धनगर यानी केले तर आभार प्रा.अनिल पाटील यानी

मानले.कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.



दि.२५/०१/२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी गावात मतदार जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन केले.त्यात प्रामुख्याने मतदार जनजागृती संदर्भात चौका चौकात पथ नाट्याचे आयोजन केले.







Bahujan Samaj Shikshan Prasarak Mandal's Arts, Commerce & Science College Songir T.& D.Dhule Established in 1996

Principal
Arts, Comm. & Sci. College
Songir, Tal & Dist.Dhule